**राष्ट्रीय कृषि योजना (RKVY)**

सन २००७-०८ या वर्षामध्ये माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय क्र. लपायो- २००८/प्र.क्र.४३/जल-१**
**मंत्रालय, मुंबई - ४०००३२**
**दिनांक : १२ मार्च, २००८**

वाचा:-

१. शासन निर्णय लपायौ-१०९५/प्र.क्र.२६६/जल-२अ, दिनांक १५ मे, १९९६
२. शासन निर्णय कृषि पदुम विभाग क्रमांक : समिती २००७/प्र.क्र.०१/राकृवियो कक्ष दिनांक २० सप्टेंबर २००७
३. शासन निर्णय कृषि पदुम विभाग क्रमांक : समिती २००७/प्र.क्र.०९/राकृवियो कक्ष दिनांक २० सप्टेंबर २००७
४. शासन निर्णय कृषि पदुम विभाग क्रमांक : समिती २००७/प्र.क्र.०१/राकृवियो कक्ष दिनांक ६ नोव्हेंबर, २००७
५. केंद्रीय कृषी मंत्रालय पत्र क्रमांक १२-३/२००७ पीसी/दिनांक ६ सप्टेंबर, २००७
६. कृषि विभागाचे पत्र क्रमांक आरकेवाय १००७/प्र.क्र.३७ /राकृवियो कक्ष, दिनांक ११ डिसेंबर, २००७
७. अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांचे क्रमांक ३३६/अअ/ताशा-५/रा.कृ वि.धो.-मा.मा. दुरुस्ती/०८, दिनांक ३० जानेवारी, २००८.
८. शासन निर्णय कृषि पदुम विभाग क्रमांक : राकृयो १००७/प्र.क्र.३९/राकृवियो कक्ष दिनांक २५ फेब्रुवारी, २००७
९. समक्रमांकाचे दिनांक १६ फेब्रुवारी २००८ चे अर्ध शासकीय पत्र.
१०. केंद्रीय कृषि मंत्रालयाचे पत्र क्रमांक- १-११/२००७-RKVY, दि. ४ मार्च, २००८.

प्रस्तावना -

देशामध्ये आर्थिक सुधारण करण्यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेत नियोजन आयोगाकडून ९% इतका आर्थिक विकासाचा दर निश्चित करण्यात आला असून त्यामध्ये कृषि क्षेत्राचा समावेश आहे. देशातील ५०% पेक्षा अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून असूनही कृषि

क्षेत्राची उत्पादकता अनेक राज्यात कमी झाल्याने आढळून आले. कृषि क्षेत्रातील दर विहित ४% पेक्षा कमी झाल्याने कृषि क्षेत्रातील गुंतवणूकीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष भर देण्याचे धोरण केंद्र शासनाने स्वीकारले आहे. त्याचाच परिणाम म्हणून राष्ट्रीय विकास परिषदेने (NDC) दि. २९ मे, २००७ रोजी झालेल्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र. ५३ नुसार अकराव्या पंचवार्षिक योजनेत ४% कृषि विकास दराचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार प्रत्येक राज्याच्या कृषि विकासांचा आराखडा तयार करताना केवळ शेतीचा विचार न करता शेतीसह पशुसंवर्धन, मत्स व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, लघुपाटबंधारे, ग्राम विकास योजना, जलसंधारण इत्यादी सर्व बाबींचा विचार करावयाचा आहे.

२. कृषि क्षेत्रात ४% उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय विकास योजना (RKVY) व फुड मिशन या दोन नविन योजना जाहीर केल्या आहेत. राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाकडून अतिरिक्त सहाय्य उपलब्ध होणार असून त्याची विभागणी दोन भागात करण्यात आली आहे. त्यापैकी स्त्रोत-१ अंतर्गत विशिष्ट प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून अतिरिक्त मदत उपलब्ध होणार असून स्त्रोत-२ खाली कृषि विकासासाठी येणाऱ्या विविध योजना अधिक कार्यक्षम करण्यासाठी निधी उपलब्ध होणार आहे.

३. रष्ट्रीय विकास परिषदेने निश्चित केलेल्या ४% कृषि विकासाचा दर गाठण्यसाठी राज्याने आतापर्यंत केलेली कामगिरी यापुढे करावयाची उपाययोजना सविस्तर सादरीकरण मा. प्रधानमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ ऑगस्ट, २००७ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत करण्यात आले. या बैठकीत केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र रिझोल्यूशन (Maharashtra Resolution) केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या दि. ६ सप्टेंबर, २००७ च्या पत्रानुसार पारित करण्यत आला आहे. यामध्ये एकूण १८ बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये जलसंधारण विभागाशी संबंधित अनुक्रमांक-४ येथे मान्य केलेला पुढील कार्यक्रम राबवायचा आहे.

Agriculture in Maharashtra primarily being rain-fed, watershed development will be the major strategy for increasing the agriculture production and productivity. This will include watershed treatment on 50 lakh hectares and various measures for protective irrigation and water recharging including 3 lakh farm ponds; repair of 6500 bodis and treatment in 1 lakh hectares in ill-drain saliain soils of Purna basin.

4. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्त्रोत-१ अंतर्गत मान्यता मिळणाऱ्या विशिष्ट प्रकल्पांना मंजुरी देण्याकरीता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन संदर्भाधीन दि. २० सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय कृषि विकास योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण यसाठी राज्यस्तरीय

प्रकल्प मंजूर समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीच्या दिनांक ४ डिसेंबर, २००७ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत जलसंधारण विभागाच्या खालील योजनांना मान्यता देण्यात आली आहे:-

## Water Conservation

1) <u>Farm ponds</u> : This programme will be taken in 16 cotton growing districts of Vidarbha and Marathwada Regions. The programme has to be linked with Purna Basin area development program. Total target for 2007-08 will be 175000 Farm Ponds of which target of 3 districts of Purna Basin will be 4500 farm ponds (1,500 for each of the 3 districts) leaving 13000 farm ponds of the remaining 13 districts. (1,000 for each of the 13 districts).

It was decided to allow the beneficiary to utilize mechanization / machine facility considering the constraint of non-availability of labour and availability of stipulated time limit to complete this program (i.e. Before the ensuing kharif season). If the work is to be allowed/done by use of machine then the cost norm has to be reduced by 30%

Initially, only small and marginal farmers should be covered in a Antodaya mode and community ponds be allowed considering their meager land holding. Detailed guidelines will be issued by Water Conservation. However, following broad guidelines were decided.

i) There shall be 30% cost reduction due to use of machinery over the estimates prepared by the Water Conservation Department, which are based on EGS norme.
ii) Machinery shall be hired by the farmers, themselves. The beneficiary will be at liberty to execute a part of it through labour
iii) Upper Cost limit shall be indicated.

<u>Amount Sanctioned Rs. 80.00</u>

2) A dicision was taken to consider the point of sanctioning funds for repairs to Bodis and Watershed development in the next meeting of the Committee.

Repairs to Malgujari Tanks

13 This programme will be taken in Gadchiroli, Chandrapur, Gondia and Bhandara Districts of Vidarbha Region. Only Malgujari Tanks with clear catchments should be taken.

Amount sanctioned Rs. 20.00 crores

4) Shallow Tube well : This Programme will be taken inGadchirolu,Bhandara, Gondia, Chandrapur and Ramtek taluka of Nagpur district. Total target will be 1150 tube wells out of which 500 tube wells in Gadchirili 200 each in Bhandara, Gondia and Chandrapur Districts and 50 in Ramtaek Taluka of Nagpur District. While issuing cost norms and guidelines for implementation, the GSDA report in this regard should be taken into account.

Amount sanctioned Rs. 14.00 crores

राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी व संनियंत्रण याकरिता केंद्र शासनाने विहित केलेल्या कार्यात्मक मार्गदर्शक सूचनेतील ५.१ नुसार महाराष्ट्र राज्य छोटया शेतकऱ्यांचा कृषि व्यापक संघ, पुणे या संस्थेला नोडल संदर्भाधीन दि. ६ नोव्हेंबर, २००७ च्या शासन निर्णयानुसार नामनिर्देशित करण्यात आले आहे. केंद्र शासनाकडून राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत मंजूर होणारा निधी या संस्थेच्या स्वतंत्र बँक खात्यात हस्तांतरित होणार आहे.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या मान्यतेने जलसंधारण विभागाच्या योजनांना दिलेल्या मान्यतेनुसार माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम राबविण्याबाबत खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

## शासन निर्णय:

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या जिल्हयांत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ४ जिल्हयांत एकूण ६४७३ माजी मालगुजारी तलाव असून त्यापैकी विदर्भ विकासाच्या कालबध्द कार्यक्रमांतर्गत सन २००६ पर्यंत २३४८ तलाव दुरुस्त करण्यत आले आहेत. शासनाच्या ग्रामीण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय समविकास योजना, जिल्हा परिषद व शासनाच्या नियमित निधीमधून १२७५ तलाव दुरुस्त करण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी १००९ तलाव महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दुरुस्त करण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित २८५० तलावांपैकी १४४५ तलावांची

सद्यस्थिती करण्याचे आवश्यकता नसून त्यातील १४.०५ तलावांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी सन २००७-०८ या वर्षात मंजूर रुपये २०.०० कोटी (रु.विस कोटी) इतक्या निधीपैकी शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग क्रमांक - राकृवि-१००७/प्र.क्र.३९/राकृयो कक्ष, दिनांक २५ फेब्रुवारी २००८ अन्वये रु. ५.०० कोटी निधी आकस्मिक निधी अग्रीमाव्दारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निधीमधून सन २००७-०८ मध्ये १४०५ तलावांपैकी १५० तलाव राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत दुरुस्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत (Clear catchment area) असलेल्या, कमीत कमी वेळेत व कमीत कमी खर्चात कायमस्वरुपी सिंचन क्षमता पुर्नस्थापित होऊ शकेल व त्याचा लाभ शेतकऱ्यांना होईल अशाच तलावांच्या दुरुस्तीच्या कामांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत १५० निवडलेल्या तलावांची दुरुस्तीची कामे पूर्ण इ्ााल्यानंतर ९७२ हेक्टर सिंचन क्षमता पुर्नस्थापित होणार आहे. त्याबाबतचा जिल्हानिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | माजी मालगुजारी तलाव दुरुस्तीचे भौतिक उद्दिष्ट (वर्ष २००७-०८) | आर्थिक उद्दिष्ट (वर्ष २००७-०८) (रुपये लक्ष) | पुर्नस्थापित सिंचन क्षमता (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर | ५० | १५०.०० | ३०० |
| २ | गडचिरोली | २५ | १५५.०० | ७५ |
| ३ | भंडारा | २५ | ९२.५० | ३८७ |
| ४ | गोंदिया | ५० | १०२.५० | २१० |
| | **एकूण** | **१५०** | **५००.००** | **९७२** |

२. माजी मालगुजारी तलावांची दुरुस्तीची सर्व कामे निविदा मागवून कंत्राटदारामार्फत करण्यात यावीत. ही कामे करताना मशिनचा वापर करण्यात येणार असल्याने कामाची अंदाजपत्रके तयार करताना मशिनच्या वापराच्या दराप्रमाणे करण्यात यावीत.

३. या कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी व वेळोवेळी आढावा घेण्यासाठी विभागीय महसूल आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| विभागीय आयुक्त | : | अध्यक्ष |
| जिल्हाधिकारी (संबंधित) | : | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधित) | : | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| विभागीय कृषि सह संचालक, नागपूर | : | सदस्य |
| अधिक्षक अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर ) नागपूर | : | सदस्य सचिव |

४. या कार्यक्रमांतर्गत कामाची आखणी करणे, अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे तसेच सदर आराखडयास आवश्यकता ती प्रशासकीय व तांत्रिक प्राप्त करुन घेणे व त्यानुसार हा कार्यक्रम राबविण्याची प्रत्यक्ष जबाबदारी अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) यांची राहील. अधीक्षक अभियंता हे या योजनेच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचा अहवाल दर महिन्याच्या १० तारखेच्या आत शासनाने सादर करतील व त्याची एक प्रत विभागीय आयुक्त, नागपूर व मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करतील.

**5. दुरुस्तीची व्याप्ती :-**

माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीमध्ये पाळीचर दुरुस्ती, सांडवा दुरुस्ती, पाळीची उंची वाढविणे/ तलावातील गाळ काढणे, जेथे आवश्यक असेल तेथे विमोचमाचीदुरुस्ती/नविन विमोचक बसविणे/ पाळीवरती मुरुम टाकणे, आवश्यकतेनुसार धोबी घाट बांधणे. आवश्यकतेनुसार दगड अश्मपटलांचे बांधकाम करणे/ दुरुस्ती करणे आवश्यक असेल तेथे कालव्यांची दुरुस्ती इत्यादी अनुषंगिक बाबींचा समावेश करुन प्रकल्प अहवाल तयार करावा.

**6. तांत्रिक मान्यता**

या कार्यक्रमांतर्गत माजी मालगुजारी तलावांची विशेष दुरुस्ती करावयाची असल्याने, त्या कामांना तंत्रिक मान्यता देण्याचे अधिकार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील परिशिष्ठ ४२ अन्वेय रुपये ५.०० लक्षपर्यंतच्या कामांना कार्यकारी अभियंता, यांना व त्यापुढील दुरुस्तीच्या कामांना अधीक्षक अभियंता तांत्रिक मान्यता देतील.

७. **प्रशासकीय मान्यता**

० ते १०० हेक्टर क्षमतेच्या माजी मालागुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास जिल्हा परिषद, प्रशासकीय मान्यता देईल व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या माजी मालगुजारी तलावांच्या प्रस्तावास शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. मात्र हे प्रस्ताव संबंधित अधीक्षक अभियंता, लघू पाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत सादर करावेत.

८. **निधीची उपलब्धता :-**

८-१.	राष्ट्रीय कृषि विकास योजनेत सन २००७-०८ करीता माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या कार्यक्रमासाठी शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग क्रमांक-राकृवि-१००७/प्र.क्र.३९/राकृयो कक्ष, दिनांक २५ फेब्रुवारी २००८ अन्वये रुपये ५.०० कोटी निधी आकस्मिक निधी अग्रिमाव्दारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाअन्वये हा निधी आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे सुर्पुद करण्यांत आला असून त्यांनी हा निधी कोषागारातून आंहरित करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, छोटया शेतकऱ्यांच्या कृषि व्यापारी संघ, पुणे यांच्याकडे सुपुर्द करावयाचा आहे. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, छोटया शेतकऱ्याचा कृषि व्यापारी संघ यांनी आयुक्त, कृषि महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून उपलब्ध होणारा रुपये ५.०० कोटी निधी राष्ट्रीय कृषि विकास योजनेकरीता नव्याने सुरु केलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करावयाचा आहे.

८-२.	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य छोटया शेतकऱ्यांचा कृषि व्यापारी संघ यांनी त्यानंतर त्यांच्याकडे जमा होणार असलेला सदर अधीक्षक अभियंत, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ नागपूर, यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग नागपूर, यांच्याकडे चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदीया या चार जिल्हयात सदर योजना राबविण्यासाठी रोखीत धनादेशाव्दारे सुपुर्द करावा. संबधित कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नागपूर यांनी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त होणारा निधी जमा करण्यासाठी त्यांच्या नावे "बँक ऑफ महाराष्ट्र" नागपूर येथे उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये सदर रक्कम जमा करावी.

८-३.	वरील चार जिल्हयांपैकी गडचिरोली व भंडारा या जिल्हयांसाठी लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) या यंत्रणेची स्वतंत्र कार्यालय नसल्याने हे जिल्हे अनुक्रमे चंद्रपूर व गोंदीया जिल्हयाच्या कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. तथापी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, गोंदीया यांचेकडे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या निधीसाठी स्वतंत्र खाते उघडण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, चंद्रपूर यांच्याकडे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून प्राप्त होणाऱ्या निधीसाठी स्वतंत्र खाते उघडण्यांत आलेले आहे. तथपी माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी गडचिरोली व चंद्रपूर या जिल्हयांसाठी उपलब्ध होणारा निधी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, चंद्रपूर व गोंदीया व भंडारा या जिल्हयासाठी उपलब्ध होणारा निधी कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नागपूर यांच्याकडे वेगळयाने ठेवण्याच्या ऐवजी या चार जिल्हयांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला सर्व निधी हिशोब ठेवण्याच्या दृष्टीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नागपूर यांच्या नावे "बँक ऑफ महाराष्ट्रा" नागपूर येथे उघडण्यात आलेल्या खात्यामध्ये जमा करण्यात यावा. वरील प्रमाणे चार जिल्हयांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधीमधून घेण्यात येणाऱ्या कामांची देयके संबधीत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) व संबंधीत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडून अधीक्षक, लघु पाटबंधारे

(स्थानिक स्तर) मंडळ नागपूर यांना सादर करण्यात येतील. व त्या देयकाची छाननी केल्यानंतर ती देयके अधिक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) यांच्याकडून मंजूर करण्यात येवून त्याप्रमाणे् निधी वितरीत करण्यात येईल.

१. माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली नोंदवावा.

"मागणी क्र.डी-९,४४०१-पीक संवर्धनावरील भांडवली खर्च, (००)(८००) इतर खर्च, (००)(०१) राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत सहाय्यक अनुदान, (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना), ५३ मुख्य बांधकामे (४४०१-०४८-१) योजनांतर्गत/दत्तमत्त"

हा खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र. आकनि-११.०८/७९/अर्थसंकल्प-१३, दिनांक ६/२/२००८ अन्वये (संगणक सांकेतांक-८०००-३४०-७) मंजूर केलेले अशा स्पष्ट सुचन "लाल शाईने" अधेरेखित करावे. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८/८/१९८६ अन्वये केलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

१०. अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, नागपूर यांना मंजूर केलेल्या निधीचे जिल्हानिहाय वितरण करण्यास प्रधिकृत करण्यात येत आहे. मंजूर केलेला निधी त्याच खात्यावर खर्च होईल याची जबाबदारी, संबंधित अधिकाऱ्याची राहील.

११. हा शासन निणर्य मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या राज्यस्तरीय प्रकल्प समितीने दिलेल्या मान्यतेनुसार व कृषि विभागाच्या अनौपचारिक संदर्भ दिनांक २५ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार वित्त विभागाच्या मान्यतेने त्याचा अनौपचारिक संदर्भ क्र. १२/८/व्यय-१, दिनांक १४/१/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २००८०३१२१७४७२९००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिलीप शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव,
सर्व मा. मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्यस्तरीय जलसंधारण सल्लागार परिषद,
मुख्य सचिव, यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव,/प्रधान सचिव,/सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य पुणे,
महासंचालक, कै, वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, सामाजिक वनिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,/ सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सर्व
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद सर्व
संचालक , अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/ महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रशिध्दी करीता)
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व मुख्य वनसंरक्षक/सर्व उप वनसंरक्षक,
सर्व उपायुक्त (विकास)
महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई-३२

निवडनस्ती - जल-१